पारनेर तालुक्यातील पिंपळगांव जोगे प्रकल्पाच्या सिंचन व्यवस्थापनेसाठी नारायणगांव विभागांतर्गत उपविभाग स्थलांतरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक :- आढावा-२०१९/प्र.क्र.३४/२०१९/आ(पुनर्रचना),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ सप्टेंबर, २०१९

वाचा:- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : १०९२/सीआर/८०६/व्यय-६, दि.१५/१०/१९९२
२) शासन निर्णय जलसंपदा विभाग, क्रमांक: आढावा-१००२/३३५/२००२/आ.(प्रशि), दि.०६/०२/२००३

प्रस्तावना : -

कुकडी सिंचन मंडळ, पुणे अंतर्गतचे पिंपळगांव जोगे पाटबंधारे उपविभाग, नारायणगांव, जि. पुणे हे उपविभागीय कार्यालय कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १, नारायणगांव, जि. पुणे या विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे. सध्या या उपविभागाच्या अधिपत्याखाली पिंपळगांव जोगे धरण शाखा, कळंब, पिंपळगांव जोगे सिंचन शाखा, पिंपळवाडी, पिंपळगांव जोगे सिंचन शाखा क्र. १, बेल्हा आणि पिंपळगांव जोगे सिंचन शाखा क्र.२, अळकुटी अशा ४ सिंचन व्यवस्थापन शाखा कार्यरत आहेत. पारनेर तालुक्यातील पिंपळगांव जोगे प्रकल्पाच्या सिंचन व्यवस्थापनेसाठी नारायणगांव विभागांतर्गत असलेला एक उपविभाग अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यात स्थलांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे अधिनस्त कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगांव अंतर्गतचे पिंपळगांव जोगे पाटबंधारे उपविभाग, नारायणगांव या उपविभागीय कार्यालयाचे मुख्यालय नारायणगांव येथून अळकुटी, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे स्थलांतरीत करण्यास तसेच, या विभागांतर्गतच्या कुकडी पाटबंधारे उपविभाग क्र.१, नारायणगांव अधिनस्त कार्यरत असलेल्या कुकडी सिंचन शाखा, अळकुटी व कुकडी सिंचन शाखा, निघोज या दोन शाखा कार्यालयांचे नियंत्रण अळकुटी, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे स्थलांतरीत होणाऱ्या

पिंपळगांव जोगे पाटबंधारे उपविभाग अंतर्गत वर्ग करण्यास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

- पिंपळगांव जोगे पाटबंधारे उपविभाग हे उपविभागीय कार्यालय मूळ कार्यभारासह व मंजूर पदांसह स्थलांतरीत मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत राहील.
- या उपविभागीय कार्यालयाच्या मंडळ व विभागीय नियंत्रणात कोणताही बदल करण्यात येत नाही.
- कुकडी पाटबंधारे उपविभाग क्र.१, नारायणगांव अधिनस्त कार्यरत असलेल्या कुकडी सिंचन शाखा, अळकुटी व कुकडी सिंचन शाखा, निघोज या दोन शाखा कार्यालयांच्या उपविभागीय नियंत्रणात बदल करण्यात येत असून विभागीय नियंत्रणात कोणताही बदल करण्यात येत नाही.
- स्थलांतरीत कार्यालये शासकीय जागेतच कार्यान्वित करण्यात यावीत, त्यासाठी बांधकामाचा वेगळ्याने खर्च करु नये. तसेच, सध्याच्या कार्यरत उपविभागातील उपलब्ध साहित्याचाच वापर करण्यात यावा.
- प्रशासकीय व आस्थापना खर्चात वाढ होणार नाही याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

२. स्थलांतरणानंतर उपविभागीय कार्यालयांची सुधारित रचना खालील प्रमाणे राहील. तथापि, मंडळांतर्गतच्या इतर विभाग व उपविभागीय कार्यालयांमध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही. :-

अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे या अधिनस्त -	
कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगांव अंतर्गत -	
पिंपळगांव जोगे पाटबंधारे उपविभाग, अळकुटी ता. पारनेर, जि. अहमदनगर अंतर्गत -	कुकडी पाटबंधारे उपविभाग क्र.१, नारायणगांव अंतर्गत -
पिंपळगांव जोगे धरण शाखा, कळंब	येडगाव धरण शाखा, येडगाव
पिंपळगांव जोगे सिंचन शाखा, पिंपळवाडी	कुकडी सिंचन शाखा, नाराणगांव
पिंपळगांव जोगे सिंचन शाखा क्र. १, बेल्हा	माणिकडोह धरण व कालवा शाखा, माणिकडोह
पिंपळगांव जोगे सिंचन शाखा क्र.२, अळकुटी	
कुकडी सिंचन शाखा, अळकुटी	
कुकडी सिंचन शाखा, निघोज	

३. उपविभागीय कार्यालयाच्या मुख्यालय बदलानुसार सदर कार्यालय दिनांक ११/०९/२०१९ पासून अळकुटी ता. पारनेर जि. अहमदनगर येथे शासकीय जागेत कार्यान्वित होईल याद्दष्टीने अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे यांनी आवश्यक ती सर्व कार्यवाही तत्काळ करावी.

४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. १०९२/सीआर-८०६/व्यय-६, दिनांक १५/१०/१९९२ मधील तरतूदींनुसार विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार हा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९०४१५२६४२७८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2019.09.04 15:34:05 +05'30'

(सु.गं.गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री (खारभूमी) यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक
७) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा
८) मा.विधानपरिषद / विधानसभा सदस्य (सर्व)
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव (ज.सं.प्र. व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर
१४) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/ नागपूर
१५) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा (DTHRS) मेरी, नाशिक.
१७) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
१८) मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे.

१९) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
२०) उप सचिव (सेवा)/ उप सचिव (आस्था)/उप सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) आंतर वित्तीय सल्लागार व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
२३) अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे.
२४) कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगांव.
२५) कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे.
(कार्यालयाच्या मुख्यालयात व नियंत्रणात होणाऱ्या बदलांची नोंद घेण्यास्तव अग्रेषित)
२६) उपअभियंता, पिंपळगांव जोगे पाटबंधारे उपविभाग, अळकुटी, ता. पारनेर, जि. अहमदनगर.
२७) उपअभियंता, कुकडी पाटबंधारे उपविभाग क्र.१, नारायणगांव.
२८) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९) कार्यासन आस्थापना (पुनर्रचना) संग्रहार्थ.